# पलूस सहकारी बँक लि; पलूस.

प्रधान कार्यालय - मेन रोड, पलूस ता. पलूस जि. सांगली

## ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(आर्थिक वर्ष दिनांक ०१/०४/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१)

**- फक्त भागधारकांसाठी -**

आपल्या बँकेच्या सर्व भागधारकांची **५६ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार, दिनांक २९/०८/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता VC/OAVM द्वारे (ऑनलाईन पध्दतीने) बँकेच्या प्रधान कार्यालय, पलूस** येथे खालील विषयांवर विचार विनिमय करणेकरिता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी **VC/OAVM** द्वारे सहभाग घ्यावा, अशी नम्र विनंती आहे.

**--- सभेपुढील विषय ---**

१) दिनांक २४/०१/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थितीत असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

३) दिनांक ३१/०३/२०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.

४) सन २०२०-२०२१ चे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झालेले असून त्या ऑडिट मेमोचे वाचन करणे व स्विकारणे.

५) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचा वैधानिक दोष दुरूस्ती अहवाल बँकेने सहकार खात्याकडे सादर केला आहे तो वाचून स्विकारणे.

६) सन २०२०-२०२१ मधील झालेल्या निव्वळ नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणी मंजूर करणे.

७) सन २०१९-२०२० मधील शिल्लक नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणी मंजूर करणे.

८) सन २०२०-२०२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२१-२०२२ सालासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.

९) रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे सन २०२१-२०२२ साठी वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व बँकेकडे पाठविला असल्याची नोंद घेवून त्यास मान्यता देणे व यासंदर्भात मा. संचालक मंडळास आवश्यक अधिकार प्रदान करणे.

१०) सन २०२२-२०२३ साठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

११) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१२) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या व वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेल्या थकित कर्ज खात्यांचे निर्लेखन करणेबाबत विचारविनीमय करून निर्णय घेणे.

१३) महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार परतफेड योजना व एकरक्कमी तडजोड योजनेअंतर्गत पात्र कर्जदारांना दिलेली व्याजातील सवलत व झालेला वसूल इ. संबंधी आवश्यक माहितीची नोंद घेणे व मंजूरी घेणे.

१४) सन २०२०-२०२१ मधील अपेक्षित भांडवली गुंतवणूक उदा. शाखांसाठी इमारत / बांधकाम / फर्निचर संगणक प्रणाली / स्थिर गुंतवणूक इ. साठी होणाऱ्या भांडवली गुंतवणूकीची नोंद घेवून त्यास मान्यता देणे.

१५) मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

ठिकाण : **पलूस**

दिनांक : १३/०८/२०२१

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन

**श्री. अनिल नामदेव घारे**

मुख्य कार्यकारी अधिकारी

---

### सभासदांना नम्र विनंती

१) सभासदांना सभेच्या कामकाजात सहभागी होणेसाठी बँकेकडे नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर स्वतंत्र लिंक पाठविण्यात येईल. त्यानुसार ऑनलाईन सहभाग नोंदविल्यानंतर (Meeting Join) संबंधित सभासदाची उपस्थिती ग्राह्य धरली जाईल.

२) बँकेच्या सभासदांनी नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधून आपला मोबाईल क्रमांक, ईमेल, व्हॉटस अॅप सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाचीच नोंद करावी.

३) सभासदांना अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकासंबंधी काही माहिती पाहिजे असल्यास ती त्यांना बँकेच्या प्रधान कार्यालयात ऑफिस वेळेत मिळू शकेल. त्याचप्रमाणे सभासदांना सभेच्या वेळी काही प्रश्न विचारावयाचे असलेस त्यांनी ते दिनांक २३/०८/२०२१ पूर्वी बँकेच्या प्रधान कार्यालयात लेखी द्यावेत.

४) सभासदांनी मागणी केल्यास नजिकच्या शाखेत अहवालाचा अंक मिळेल तसेच बँकेची वेबसाईट www.palusbank.com यावरही उपलब्ध आहे.



## अध्यक्षांचे मनोगत...!

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या बँकेच्या **५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये** ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, लेखापरिक्षण अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक व इतर विषय मा. संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना व आपणांशी संवाद साधताना मला अतिशय आनंद होत आहे. मी व्यक्तीशः व सर्व संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्व सभासदांचे मनःपूर्वक हार्दिक स्वागत करतो व आपण आजअखेर केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतो .

आपणा सर्वांचे प्रेरणास्थान **मा.कै. वसंतरावजी पांडुरंग पुदाले (दादा)** यांनी सहकारातून सर्वसामान्य माणसाची आर्थिक उन्नती व पारदर्शक कारभार हा सहकारासाठी जो गुरूमंत्र दिला आहे. त्यांचेच विचार जोपासून व आपणा सर्वाचे सहकार्याने **बँकेची चौफेर प्रगती** चालू आहे.

अहवाल सालात **कोरोना विषाणू महामारीचा संसर्ग** संपूर्ण वर्षभर राहिला. त्याचा सर्वच उदयोग, व्यवसाय, व्यापार, शेतकरी वर्गावर मोठा विपरित परिणाम झाला. लोकांच्या उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात घट झाली हे आपणा सर्वांना माहित आहेच. अशा परिस्थितही बँकेच्या मा.संचालक मंडळाने **अतिशय अभ्यासपूर्ण व चांगले धोरणात्मक निर्णय** घेवून सदर धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली आहे. त्यामुळेच अहवाल सालात **एकूण व्यवसायात रु .३३.७१ कोटी इतकी वाढ** झालेली असून **ढोबळ नफा रु .१२.४२ कोटी इतका विक्रमी** झालेला आहे हे सर्व केवळ आपल्या सर्वाच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे ..

अहवाल सालात बँकेच्या एकूण ठेवीमध्ये अल्पशी वाढ झाली. कोरोना विषाणू संसर्गामुळे कर्जास अपेक्षित मागणी नसल्याने तसेच बँकेकडे कर्ज वाटपासाठी अतिरिक्त निधी शिल्लक असल्याने बँकेने ठेवीवरील व्याजदर सुरूवातीपासून जाणीवपूर्वक कमी ठेवून ठेव वाढ नियंत्रित केली. मात्र अहवाल सालात **बँकेने सेव्हिंग/करंट** (CASA) **डिपॉझिटमध्ये चांगली वाढ** करून ठेवीवरील सरासरी व्याजदर कमी करणेचा नियोजनबध्द प्रयत्न केल्यानेच बँकेचा **ठेवीचा सरासरी व्याजदर १% कमी** झाला. त्यामुळे यापुढे ठेवीची कॉस्ट कमी होवून नफा वाढणेवर चांगला परिणाम होणार आहे.

अहवाल सालात बँकेच्या **कर्जव्यवहारामध्ये रू. २४.७७ कोटी** इतकी वाढ झाली. कोरोना विषाणू संसर्गामूळे लॉकडाऊन, अनलॉक असतानाही कर्जव्यवहारात समाधानकारक वाढ झालेली आहे. तसेच बहुतांश कर्जदार सभासदांनी नियमितपणे कर्जाची परतफेड केल्यानेच एनपीए व नफ्याचे अपेक्षीत उद्दीष्ट पूर्ण करता आले आहे. बँकेनेही कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या **कर्जदार सभासदांना रिबेटमध्ये चांगली सवलत** दिली आहे .

बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमधील नवीन बदलानुसार रिझर्व्ह बँकेस नागरी सहकारी बँकावर नियंत्रणासाठी अधिक अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर कायदयातील बदलानुसार रिझर्व्ह बँकेमार्फत वेगवेगळे निकष लागू केले जात आहेत. याशिवाय बँकिंग क्षेत्रात तीव्र स्पर्धा असून अनेक बदल होत आहेत .रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे बँकेने **व्यवस्थापन कमिटीची** (Board Of Management) **स्थापना** केलेली आहे .रिझर्व्ह बँकेच्या सर्व मार्गदर्शक सुचनाचे काटेकोरपणे पालन केले जात आहे .

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात **निव्वळ नफा रू. २८१.१० लाख** इतका झालेला असून सदर **निव्वळ नफ्यातून सभासदांना १४% दराने लाभांश** देणेची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे त्यास मंजूरी द्यावी. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या नफ्यातून सर्वच नागरी सहकारी बँकांना डिव्हिडंड देता येणार नाही अशी मार्गदर्शक सूचना रिझर्व्ह बँकेने जारी केलेली आहे. त्यामुळे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील **शिल्लक नफ्याची रक्कम इमारत फंडास** वर्ग करण्याची शिफारस मा .संचालक मंडळाने केलेली आहे, त्यास आपण सर्वांनी एकमताने मंजुरी दयावी.

आपल्या बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाची पंचवार्षिक कालावधीची मुदत संपलेली आहे. अहवाल सालात बँकेची **पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया सहकार खात्याने सुरू** केलेली होती. तथापि कोरोना विषाणू संसर्गामुळे सर्वच सहकारी संस्थांच्या निवडणुकीस महाराष्ट्र शासनाने स्थगिती देवून विद्यमान संचालक मंडळास ३१/०८/२०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. विद्यमान संचालक मंडळाने पंचवार्षिक कालावधीत अनेक धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यानेच **बँकेच्या व्यवसायात मोठया प्रमाणात वाढ होवून बँकेचा नावलौकिक व विश्वासर्हता आणखी वाढलेली आहे.** यापुढेही आपण सर्व सभासदांनी अशाच प्रकारे सहकार्य करावे असे मी आपणांस आवाहन करतो.

# पलूस सहकारी बँक लि; पलूस

**अहवाल सालातील महत्वाच्या बाबी खालिलप्रमाणे.**

- अहवालसाल अखेर **बँकेचा एकुण व्यवसाय रू. ६८७.२७ कोटी** इतका आहे .
- अहवाल सालात बँकेस **रू .१२.४२ कोटी इतका विक्रमी ढोबळ नफा** झाला.
- अहवाल साल अखेर **बँकेचे ढोबळ एन पी ए प्रमाण ४.८१%** तर **निव्वळ एन पी ए प्रमाण 0%** राहिले.
- रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार स्वभांडवल पूर्तता प्रमाण किमान ९% असणे आवश्यक असता सदरचे प्रत्यक्ष प्रमाण **१४.५४%** इतके आहे.
- बँकेची १३ शाखांच्या ठिकाणी **१६ एटीएम सह मोबाईल बँकींग** व इतर सर्व प्रकारच्या अत्याधुनिक बँकींग सेवा दिल्या जात आहेत.
- बँकेच्या **६ शाखांच्या इमारती स्वमालकीच्या** असून शाखा महावीरनगर सांगली शाखेसाठी जागा खरेदी केली असून लवकरच सदर शाखेचे कामकाज स्वमालकीच्या इमारतीत सर्व सोयीनीयुक्त सुरू होईल.
- बँकेच्या प्रगतीचे तुलनात्मक विश्लेषण यासह **सन २०२०-२०२१ चा ताळेबंद, नफातोटा पत्रक** व इतर विषय मंजूरीसाठी आपणापुढे सादर करत आहे त्यास एकमताने मंजूरी दयावी अशी विनंती आहे.

## बँकेची तुलनात्मक सांपत्तिक परिस्थिती खालीलप्रमाणे

रूपये लाखांत

| अ.नं. | तपशिल | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सभासद | १५३०३ | १५३७७ | १५४३३ | १५५५६ | १५८०७ | १५८८२ | १५९४७ |
| २ | भाग भांडवल | ८८०.५४ | ९७०.८१ | ९९७.७४ | १०७७.८२ | १२६८.८६ | १४२८.५६ | १४९२.२६ |
| ३ | स्व:निधी | १८६६.४० | १९२२.६४ | २०४९.९४ | २२८४.१२ | २६९३.६७ | ३०५०.४५ | ३५७९.९३ |
| ४ | ठेवी | २३७०६.४९ | २६३९२.७६ | २८४९६.०७ | ३१७७०.०० | ३६८१७.३५ | ३९४३५.१६ | ४०३२९.७८ |
| ५ | कर्जे | १६८९३.९२ | १८८७२.३८ | १९७१३.९१ | २१८७६.३० | २४५४३.८७ | २५९२१.११ | २८३९७.६६ |
| ६ | एकूण व्यवसाय | ४०६००.४१ | ४५२६५.१४ | ४८२०९.९८ | ५३६४६.३० | ६१३६१.२२ | ६५३५६.२७ | ६८७२७.४४ |
| ७ | खेळते भांडवल | २७४१५.०३ | ३०३३०.८७ | ३२६४२.८२ | ३६३१८.२४ | ४२२१३.०४ | ४६०९८.९८ | ४७८००.५० |
| ८ | गुंतवणूक | ७३०२.४८ | ८६१३.४४ | १०३०१.५४ | १०९९४.२३ | १४०८७.३० | १४८५७.९३ | १४९४६.६३ |
| ९ | एन.पी.ए. रक्कम | ७८७.३९ | ८०३.२९ | ७३४.७७ | ५२९.८३ | ६९१.३० | १७७५.०६ | १३६५.१७ |
| १० | एन.पी.ए. प्रमाण (नेट) | 0% | 0% | 0% | 0% | 0% | १.७३% | 0% |
| ११ | भरलेला आयकर | ८४.१३ | ७७.२४ | २९.०० | ३२.०० | १२७.४६ | १२९.२५ | १०१.९४ |
| १२ | निव्वळ नफा | १३०.१८ | १४७.०६ | १७४.३१ | २०२.११ | २४०.०१ | २४०.८६ | २८१.१० |
| १३ | डिव्हिडंड | ११% | ११% | १०% | ११% | ११% | --- | १४% नियोजित |
| १४ | सी.आर.ए.आर. | १२.५०% | १२.२५% | १३.०४% | १३.०७% | १२.३६% | १५.०४% | १४.५४% |
| १५ | शाखा | १७ | १९ | १९ | २१ | २१ | २१ | २१ |
| १६ | सेवक वर्ग | १४४ | १४२ | १४० | १३६ | १३१ | १२८ | १२६ |
| १७ | प्रति सेवक व्यवसाय | २८१.९५ | ३१८.७७ | ३४४.३६ | ३९४.४६ | ४६८.४१ | ५१०.६० | ५४५.५६ |
| १८ | कार्यक्षेत्र | संपूर्ण महाराष्ट्र | संपूर्ण महाराष्ट्र | संपूर्ण महाराष्ट्र | संपूर्ण महाराष्ट्र | संपूर्ण महाराष्ट्र | संपूर्ण महाराष्ट्र | संपूर्ण महाराष्ट्र |
| १९ | ऑडिट वर्ग | ''अ'' | ''अ'' | ''अ'' | ''अ'' | ''अ'' | ''अ'' | ''अ'' |

# सांपत्तिक स्थिती दिनांक ३१ मार्च २०२१

(विषय क्र. ३)

ताळेबंद पत्रक (अंक लाखात) नफा-तोटा पत्रक

| भांडवल व देणी | जिंदगी व येणी | खर्च | उत्पन्न |
|---|---|---|---|
| वसूल भागभांडवल............१४९२.२६ | हातातील रोख शिल्लक......... ७६५.२६ | दिलेले व्याज ....................२५९४.२२ | कर्जावरील मिळालेले व्याज ......३४८५.४६ |
| राखीव व इतर निधी..........३५७९.९३ | बँक शिल्लक ................. १९३२.९९ | नोकर पगार व भत्ते .............९१४.४७ | गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज..१०१६.७८ |
| ठेवी...........................४०३२९.७८ | गुंतवणूक......................१४९४६.६३ | इतर खर्च ........................२९१.७९ | इतर उत्पन्न ........................५४०.३४ |
| देणे व्याज .......................६०९.४२ | दिलेली कर्जे .................२८३९७.६६ | तरतुदी ...........................८५९.०६ | |
| थकव्याज तरतुद..............१०११.१७ | येणे व्याज ......................१४३९.४९ | आयकर ..........................१०१.९४ | |
| इतर देणी.......................१५०८.०१ | इतर येणी ......................१३२९.६४ | नफा ..............................२८१.१० | |
| नफा...............................२८१.१० | | | |
| ४८८११.६७ | ४८८११.६७ | ५०४२.५८ | ५०४२.५८ |

## नफा वाटणी

अंक लाखांत (विषय क्र. ६)

| | |
|---|---|
| **निव्वळ नफा** ............. | **२८१.१०** |
| पैकी रिझर्व्ह फंड.............. | ७०.७८ |
| इमारत निधी .................... | ३.०० |
| सभासद कल्याण निधी......... | २.०० |
| सभासद प्रशिक्षण निधी ......... | ३.०० |
| डिव्हीडंड १४%.............. | २०२.३२ |

## शाखा विस्तार

| | | | |
|---|---|---|---|
| मुख्य शाखा पलूस | (०२३४६)२२६०७८ | आरग | (०२३३)२२६४११३ |
| बांबवडे | (०२३४६)२७५३४१ | मलकापूर (जि. कोल्हापूर) | (०२३२९)२२५०६४ |
| किर्लोस्करवाडी | (०२३४६)२२२६३९ | विश्रामबाग, सांगली | (०२३३)२३०१३८२ |
| तासगांव | (०२३४६)२४०८०७ | पलूस शहर शाखा | (०२३४६)२२९०७८ |
| भिलवडी | (०२३४६)२३७२१२ | लक्ष्मी मार्केट मिरज | (०२३३)२२२०३८२ |
| इस्लामपूर | (०२३४२)२२२९९१ | कुपवाड | (०२३३)२३४६३४६ |
| महावीरनगर, सांगली | (०२३३)२६२०५८२ | अकलूज (जि. सोलापूर) | (०२१८५)२२५०७८ |
| लक्ष्मीपूरी, कोल्हापूर | (०२३१)२६४१२१० | कडेगाव | (०२३४७)२४२४१५ |
| कोकरूड ता. शिराळा | (०२३४५)२२४२९२ | विटा | (०२३४७)२७३३४४ |
| उचगांव (जि. कोल्हापूर) | (०२३१)२६०५४०० | माधवनगर | (०२३३)२३१४४३३ |

## विद्यमान संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा. श्री. वैभवराव वसंतराव सुर्यवंशी (पुदाले) | चेअरमन |
| मा. श्री. शामराव आत्माराम डाके, (सर) | व्हा. चेअरमन |
| मा. श्री. विष्णू बापूराव सिसाळ | संचालक |
| मा. श्री. प्रकाश नामदेव पाटील | संचालक |
| मा. श्री. मार्तंड सदाशिव सदामते | संचालक |
| मा. श्री. शिवप्रसाद ज्ञानदेव शिंदे | संचालक |
| मा. श्री. रंगराव मारूती नलवडे | संचालक |
| मा. श्री. महिपती हंबीरराव जाधव | संचालक |
| मा. श्री. गणपती रामचंद्र सुर्यवंशी | संचालक |
| मा. श्री. बजरंग उर्फ बळवंत हैबती सुर्यवंशी | संचालक |
| मा. श्री. जगदीश हणमंत मोहोळकर | संचालक |
| मा. श्री. लालासाहेब रामचंद्र संकपाळ पाटील | संचालक |
| मा. श्री. कृष्णा विठोबा इदाटे | संचालक |
| मा. सौ. लक्ष्मी धोंडीराम कदम (दि. ३१/०५/२०२१ पर्यंत) | संचालिका |
| मा. सौ. ज्योती अभिजीत शितापे | संचालिका |
| मा. श्री. रमेश नारायण राजमाने | तज्ञ संचालक |
| मा. श्री. चंद्रकांत आण्णा गोंदील | तज्ञ संचालक |
| मा. श्री. अनिल नामदेव घारे | मुख्य कार्यकारी अधिकारी |

मा.श्री./सौ./श्रीमती ______________________

______________________

श्री सांगली/ २६२०५०८

Email : admin@palusbank.com    website : www.palusbank.com